# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१
दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२ २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.
E-mail : desk2a@ dtemaharashtra.gov.in Intern:http/www.dtemaharashtra.gov.in


कळविण्यातदिव

क्र.२अ/एडीएम/प्रवेश मान्यता/२०२०/ ३८
दि. 20 JAN 2020

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत.**
संदर्भ : मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचे दि.१८.०१.२०२० रोजीचे परिपत्रक.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाधिन परिपत्रकाची प्रत आपल्या माहिती व पुढील कार्यवाहीकरीता सोबत जोडण्यात येत आहे. कृपया पहावी.

सदर परिपत्रकातील सूचना विचारात घेता आपणांस कळविण्यात येते की, प्राधिकरणाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार राज्यातील ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर खाजगी विनाअनुदानित व शासकीय आणि अनुदानित महाविद्यालय /संस्थांनी प्राधिकरणाने निश्चित केलेले प्रक्रिया शुल्क अद्याप अदा केलेले नाही, अशा महाविद्यालयांना शेवटची संधी म्हणून दि.२४.१.२०२० रोजी पर्यन्त प्रक्रिया शुल्क अदा करण्यास प्राधिकरणाने मुदतवाढ दिलेली आहे,

तसेच त्यानंतर ज्या महाविद्यालयांकडून/संस्थेकडून प्रक्रिया शुल्क अदा केले जाईल अशा महाविद्यालय /संस्थांना दि.३१.०१.२०२० रोजी पर्यन्त एकुण प्रक्रिया शुल्कावर २५% एवढी दंड आकारणी करुन प्रक्रिया शुल्क अदा करणे बंधनकारक राहील, असे कळविले आहे.

प्राधिकरणाच्या उपरोक्त निर्देशानुसार ज्या संस्था /महाविद्यालये वरील प्रक्रिया पूर्ण करण्यास असमर्थ ठरतील अशा महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) मधील तरतूदीस अनुसरुन दि.३१.०१.२०२० रोजी नंतर प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता होणार नाही व तद्अनुषंगाने प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने भविष्यात कोणतेही न्यायालयीन प्रकरण

उद्भवल्यास, त्यास सर्वस्वी संबंधित महाविद्यालय /संस्था जबाबदार राहील याची जाणीव सर्व संबंधित संस्थांना आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई

---

**तात्काळ**
**कालमर्यादेत**

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2020/ 296
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 20 JAN 2020

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार शै.वर्ष 2019-20 मधील प्रवेश नियामक प्राधिकराने निश्चित केलेले प्रक्रिया शुल्क ज्या संस्थेने अद्यापर्यंत अदा केलेले नाही त्यांनी, दि. 24/01/2020 अदा करावे, त्यानंतर दि. 31/01/2020 पर्यंत दंड आकारणी करून शुल्क अदा करणे बंधनकारक राहिल याबाबत सर्व प्राचार्य यांनी नोंद घ्यावी.

(डॉ. राम निबुदे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

महाराष्ट्र शासन

प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

अतिमहत्वाचे / कालमर्यादा / ईमेलद्वारे

क्रमांक: प्रनिप्रा/प्र.क्र. ६६/प्रवेश मान्यता/२०१९/०२५ दिनांक : [illegible]8 JAN 2020

## "परिपत्रक"

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत..

विषय : मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १५ जानेवारी, १६ जानेवारी, १७ जानेवारी व १८ जानेवारी २०२० रोजीच्या बैठकीतील निर्णय.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदींस अनुसरुन संबंधीत विभागाच्या संचालकांनी सादर केलेल्या अहवालाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना प्रवेश मान्यता प्रदान करण्याची प्रक्रिया प्राधिकरण स्तरावर सुरु आहे. सद्यस्थितीमध्ये प्राप्त अहवालाचे अवलोकन केले असता, प्राधिकरणाच्या असे निदर्शनास आले आहे, की बहुतांशी खाजगी विनाअनुदानित व शासकीय आणि अनुदानित संस्थांनी प्राधिकरणाने निश्चित केलेले "प्रक्रिया शुल्क" अदा केलेले नाही तसेच कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या अभावी अनेक प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये त्रुटी आढळुन आल्या आहेत, या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी अद्याप प्रक्रिया शुल्क भरणा केलेला नाही व ज्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये संचालकांना व प्राधिकरण स्तरावर तपासणी / छाननी प्रक्रिये दरम्यान त्रुटी आढळुन आलेल्या आहेत, अशा सर्व संबंधीत महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना, प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येणार नाही.

सबब प्रवेशित विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन सर्व संबंधीत महाविद्यालयांना संदर्भाधीन प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीतील निर्णयान्वये खालील प्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत,-

१. राज्यातील ज्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर खाजगी विनाअनुदानित व शासकीय आणि अनुदानित महाविद्यालय/संस्थानी अद्याप प्राधिकरणाने निश्चित केलेले प्रक्रिया शुल्क अदा केलेले नाही, अशा महाविद्यालयांना शेवटची संधी म्हणुन दिनांक २४/०१/२०२० रोजी पर्यंत प्रक्रिया शुल्क अदा करण्यास मुदत वाढ देण्यात येत आहे, तदनंतर जी महाविद्यालये/संस्था प्रक्रिया शुल्क अदा करतील अशा महाविद्यालयांना दिनांक ३१/०१/२०२० रोजी पर्यंत एकुण प्रक्रिया शुल्कावर २५% दंड आकारणी करुन प्रक्रिया शुल्क अदा करणे बंधनकारक राहील. त्यानंतर प्रक्रिया शुल्क भरण्याची संधी उपलब्ध असणार नाही, याची नोंद घ्यावी.

२. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेशित, ज्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशांमध्ये संचालकांना व प्राधिकरण स्तरावर तपासणी / छाननी प्रक्रिये दरम्यान त्रुटी आढळुन आलेल्या आहेत, अशा सर्व संबंधीत महाविद्यालय/विद्यार्थी यांच्याकडून सदरील त्रुटींची दिनांक २४/०१/२०२० रोजी पर्यंत पुर्तता करणे सर्व संबंधीत संचालक स्तरावर अनिवार्य करण्यात येत आहे.

उक्त नमूद मुद्दा क्र. १ व २ येथील प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जी महाविद्यालये/संस्था प्रक्रिया पुर्ण करण्यास असमर्थ ठरतील, अशा महाविद्यालयांतील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशांना महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ३(५) मधील तरतूदीस अनुसरुन **दिनांक ३१/०१/२०२० रोजी नंतर प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता होणार नाही व तदनुषंगाने प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेच्या अनुषंगाने भविष्यात कोणतेही न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास, त्यास सर्वस्वी संबंधीत महाविद्यालय / संस्था / संचालक जबाबदार राहतील,** याची सर्वांनी गांभीर्याने नोंद घ्यावी, असे आपणास कळविण्याचे मला निर्देश आहेत.

मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य यांच्या आदेशावरुन.

**(संदीप कदम) भा.प्र.से.**
**सचिव,**
प्रवेश नियामक प्राधिकरण तथा
आयुक्त व सक्षम प्राधिकारी,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई.

प्रति,
अधिष्ठाता / प्राचार्य,
संबंधीत व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य.

प्रत वरीप्रमाणे आवश्यक कार्यवाहीकरिता तथा उक्त निर्देश संचालकांनी त्यांच्याशी निगडीत संबंधीत महाविद्यालयांना कळविण्याच्या विनंतीस अनुसरुन अग्रेषित,-

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.
२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
५. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-

१. मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. सचिव, कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. उपसचिव (ताशि - २), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. उपसचिव (शिक्षण - १), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

D:\Jayant\Registration_2019.docx